भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०४/२०१७

**१) ट्रव्हल चालकाच्या निष्काळजीपणामुळे आल्टो गाडीला मागेहुन धडक देवुन तीन व्यक्ती जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दि. १८/०४/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे आल्टो के १० वाहन क्र. एमएच.०३६५ ने आपल्या तीन सोबत्या सोबत देवरी कडुन साकोली कडे एनएच. ०६ रोडने जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनाला मागेहुन घडक मारल्याने वाहन पल्टी होवुन फिर्यादी व त्याचे सोबत असलेले व्यकंट मोतीराम राऊत वय ४८ वर्ष, श्रीराम बकाराम भुरले वय ५३ वर्ष, हिरालाल छगन भोगे वय ५२ वर्ष तिन्ही रा. लाखांदुर यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व कोणत्याही प्रकारची सुचना न देता वाहन घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी सुनिल बाबुराव परशुरामकर वय ४३ वर्ष रा. पिंपळगाव कोहळी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**२) अल्पवयीन मुलाला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०४/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा अमन रोषन खंडारे वय १६ वर्ष १० महीने हा घरी कुणालाही न सागता घरून निघुन गेला घरी परत आला नाही त्याचा शोध घेतला असता अज्ञात आरोपीने मुलाला फुस लावुन पळवुन नेल्याचा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी रोषन फकरूजी खंडारे वय ३८ वर्ष रा. इंदीरा नगर सावरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना सार्वे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०४/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी वय १५ वर्ष हीचे संशयीत आरोपी सोबत प्रेम संबंध असुन ती संशयीत आरोपी सोबत दोनदा बाहेर निघुन गेली होती त्यामुळे तीला फिर्यादीचा भाचा रत्नाकर ढोमने यांचेकडे आणुन ठेवले असता फिर्यादीच्या मुलीने कुणालाही काहीही न सांगता निघुन गेल्याने फिर्यादी याने माझ्या मुलीला संशयीत आरोपीने पळवुन नेले असावे असा संशय दर्शवील्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६३ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास परिपोउपनि डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४ आजाराला कंटाळुन स्वतः सलाईन मधुन विषारी औषध घेतल्याने मृत्यु . :—**

दिनांक १८/०४/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा मृतक डॉ. प्रितीश अरविंद भोयर वय ३० वर्ष, रा. गुजराती कॉलनी गणेशपुर हा १५ दिवसा पासुन बिमार असुन स्वतः डॉक्टर असल्याने स्वतः हा उपचार करित होता फिर्यादीने मृतकचे रूम मध्ये जावुन मृतकास पाहीले असता तो मरण पावल्याचे स्थितीत मिळुन आला मृतक मुलगा याने आजाराला कंटाळुन स्वतः सलाईन मधुन विषारी औषध घेतल्याने मरण पावलेला आहे अशा फिर्यादी अरविंद शिवाजी भोयर वय ६०वर्ष रा.गुजराती कॉलनी गणेशपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र.१७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास म. सपोनि तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**५) नदीचे पात्रातील पाण्यात बुडुन ईसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १८/०४/२०१७ चे २ दिवसापुर्वी वा. दरम्यान यातील मृतक विगनेश घनशामसिंह पवार वय ३५ वर्ष, रा. मेंढा चपराळ हा दारू पाणी पिण्याचे सवईचा असुन मृतकचे प्रेत चुलबंद नदीचे पात्रातील पाण्यात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी जोंगेद्र महादेव शहारे वय ३९ वर्ष रा. चपराळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे मर्ग क्र.१७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

**६) खिडकीतील पेटता दिवा अंगावर पडुन जळाल्याने मृत्यु . :–**

दिनांक १८/०४/२०१७ चे ०४.४०वा. दरम्यान यातील मृतक श्रीमती कुंदा सुनील गभणे वय ३५ वर्ष रा. गायमुख ही घरी स्वयंपाक करित असता खिडकीतील दिवा अंगावर पडुन ८५ टक्के जळाल्याने तीला औषधोपचारा करिता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचार दरम्यान मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे डॉ. मेमो वरून मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना भगत यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलकी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे.

**७) अतीप्रमानात मध प्राषन केल्याने ईसमाचा औषधपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक १७/०४/२०१७ चे १४.३०वा. दरम्यान यातील मृतक रामरतन गोवर्धन शहारे वय ३० वर्ष, रा. रोंधा याने अतीप्रमानात मध प्राषन केल्याने त्यास औषधपचारा करिता सा.रू. भंडारा येथे भरती केले असतो उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे. भंडारा येथे डॉ. मेमो वरून मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बिंझाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे.

**८) अवैध दारु अड्यांवर / जुगारावर धाडी . :–**

दिनांक १८/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,मोहाडी,करडी,गोबरवाही,लाखनी, पवनी, लाखांदुर, येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५३ लिटर हा.भ.दारू + १५ किलो सडवा साहीत्य किंमती ५५५०/–रु, ५ लिटर ५८० मीलीलीटर देशी दारू.+ नगदी ३२००/रू.एकुन किंमती ४७८८ /रू. तसेच जुगारातुन किमंती १५५/रू. चा माल जप्त करण्यात आला आहे. असा एकुण किंमती १०,४९३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १८/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन १०२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

19.4.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.